

पीएमपीच्या चालकांना मिळणार विशेष प्रशिक्षण

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्षे ३रे

www.metrocityvrutant.in | मंगळवार दिनांक 07/01/२०२५ | METRO CITY VRUTANT

पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 19 || RNI - MAHMAR/2021/51259 || metrocity924@gmail.com




# शहरात प्रचंड वाहतूक कोंडी व प्रदूषण !

## वाहतूक कोंडी सुरळीत करणे आवश्यक : नागरिकांच्या अपेक्षा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी, पिंपरी चिंचवड शहरात प्रदूषण हे मोठ्या प्रमाणात वाढत आहे. शहरातील वाढत्या वाहतुकीमुळे प्रदूषणात वाढ होत आहे. पिंपरी चिंचवड शहरातील लोकसंख्या ३७ लाखांपर्यंत वाढली आहे. जस-जशी लोकसंख्या वाढत आहे, तस-तशी वाहनांची संख्या ही वाढत आहे. परंतु पिंपरी-चिंचवड शहर प्रशासनाच्या वतीने सुरळीत वाहतुकीचे नियोजन शून्य असल्याने शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी वाढत आहे. शहरात प्रामुख्याने तापकीर चौक, भूमकर चौक, चिंचवड स्टेशन, रावेत, पिंपरी बाजार, चाफेकर चौक या प्रमुख रस्त्यांवर वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात मिळत आहे.**

प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याने वाहतूक कोंडीवर नियंत्रण राहिलेले नाही त्यामुळे वातावरणात प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे, या वाढलेल्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला असून, शहरातील नागरिकांमध्ये श्वसनाचे आजार वाढत आहे. हवेमुळे प्रदूषणाचे कण नाकात-तोंडात जात असल्याने नागरिकांना यासंदर्भातील आजाराला तोंड द्यावे लागत आहे. यामुळे वेगवेगळे आजार होण्याची शक्यता निर्माण होते. त्यामध्ये दवाखान्यात गेल्यानंतर विविध खर्च होत असतो. यासाठी वाहतूक पोलिसांनी योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे. प्रथम वाहतूक कोंडी सोडविणे आवश्यक आहे. सुरळीत वाहतूक होत असतानाच कालबाह्य झालेल्या वाहनांची चौकशी होणे आवश्यक आहे. प्रत्येक वाहनांची पीयूसी तपासणी होणे आवश्यक आहे.पिंपरी चिंचवड शहरात ज्याप्रमाणे हेल्मेट सक्ती करण्यात येत आहे, त्याचप्रमाणे कालबाह्य वाहने वाहतुकीतून वगळणे ही आवश्यक आहे तसेच वातावरणात प्रदूषण वाढू नये, यासाठीही योग्य प्रकारे नियोजन करणे आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होणार नाही तसेच वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी योग्य उपाययोजना केल्याने वाहतुक सुरळीत होईल, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. परंतु, तसे होत नाही,यासाठी एक उदाहरण द्यावे लागते तापकीर चौकात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असताना बीआरटी मार्गातूनही खाजगी वाहने सर्रासपणे सुरू असतात. बी आर टी रस्त्या मधून खाजगी वाहनांना बंदी असतानाही तापकीर चौकात अशी वाहने बीआरटी मार्गाने चालविणारे वाहक मोठ्या प्रमाणात वाढले आहे.



त्यामुळे अपघाताचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अशा अपघाताच्या घटनांना ही आळा बसणे आवश्यक आहे. वाहतूक प्रशासनाने वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्या नागरिकांवर योग्य ते कारवाई करावी, ती केली जाते. परंतु वाढणारे प्रदूषण व वाढणारी वाहतूक कोंडी यावरही नियंत्रण आणणे आवश्यक आहे.

> “वाहतूक सुरळीत होणे आवश्यक आहे. वाहतूक कोंडीमुळे घरी जाण्यासाठी खूप उशीर होतो, जेथे अर्धा तास लागायचा, तेथे दीड- दोन तास लागतात. काही वाहने वाहतुकीचे नियम न पाळता, सर्रासपणे वाहन चालवितात, या सर्व समस्यांचे निराकरण होणे आवश्यक आहे.”
>
> - अर्जुन परदेशी, (नोकरदार)

> “वाढलेल्या प्रदूषणामुळे आजारांना निमंत्रण दिले जाते, फुपुसाचे आजार मोठ्या प्रमाणात वाढले आहे, दम्याचे व खोकल्याचे ही आजार वाढले आहे. त्यामुळे रस्त्यावर आम्हासारख्या भाजी विक्रेत्यांना भाजी व्यवसाय करणे अवघड झाले आहे, याकरिता शहरातील वाढलेल्या वाहतूक प्रदूषणावर आळा घालणे आवश्यक आहे.”
>
> - शीतल कांबळे ( भाजी विक्रेत्या)

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 07/01/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पिं.चिं.शहर पत्रकार संघाच्या वतीने मराठी पत्रकार दिन साजरा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेल्या दर्पण या मराठी वृत्तपत्राची सुरुवात 6 जानेवारी 1832 मध्ये केली. हा दिवस महाराष्ट्रात मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो.

या मराठी पत्रकार दिनाच्या निमित्ताने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत पिंपरी चिंचवड शहर पत्रकार संघाच्या वतीने मराठी पत्रकार दिन साजरा करण्यात आला.

या निमित्ताने आचार्य श्री बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी पिंपरी चिंचवड शहर पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष बापू गोरे, पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष सायली कुलकर्णी, उपाध्यक्ष रेहान सय्यद, सचिव संतोष जराड, पत्रकार शबनम सय्यद व पत्रकार श्रद्धा प्रभुणे यांच्यासह पत्रकार अनिल वडघुले पत्रकार रामकुमार शेडगे प्रामुख्याने उपस्थित होते.



# देवेंद्र फडणवीस पुण्याचे पालकमंत्री व्हावे - माधव पाटील

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहरात एकही सांगण्यासारखा उपक्रम झाला नाही, तसेच भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नावरही प्रशासन आणि राजकारणी शांत आहे.यासाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे मुख्य प्रवक्ते माधव पाटील यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले.त्यांनी म्हंटले कि, सुप्रियाताई सुळे म्हणाल्या की सध्या राजकारणात फक्त आपण ऍक्टिव्ह मोडमध्ये आहात.

त्याचप्रमाणे गडचिरोलीला भेट देऊन तिथल्या बांधवांच्या समस्यांना तुम्ही उत्तरे शोधणार आहात. आमच्याही पिंपरी चिंचवड शहराकडे आपण लक्ष द्यावे ही विनंती केली. माधव पाटील म्हणतात की,



महानगरपालिकेचे नागरिकांचे प्रश्न सोडवण्याकडे लक्ष नाही. त्यात कुत्र्यांच्या निर्बीजीकरणात झालेला भ्रष्टाचार. या सर्वांवर श्वेतपत्रिका काढावी कारण पिंपरी चिंचवड चा प्रत्येक ना सामान्य नागरिक कुत्र्यांच्या भीतीमुळे जीव मुठीत घेऊन जगत आहे.

त्यामुळेच फडणवीस यांनी पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री व्हावे.

त्यामुळे पिंपरी चिंचवड शहराचे प्रश्न सुटतील असे आम्हाला वाटते.

म्हणूनच तीस लाख पिंपरी चिंचवडच्या नागरिकांची विनंती केली आहे.

तसेच भटक्या कुत्र्यांचा प्रश्न वेळोवेळी उपस्थित करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान मुख्यमंत्र्यांनी करावा. तसेच या पत्राद्वारे माधव पाटील यांनी पिंपरी चिंचवडचे आयुक्त यांचा राजीनामा तात्काळ घ्यावा अशी मागणी केली.

# बनावट ऑईल विक्री ; एकावर गुन्हा दाखल




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : कॅस्ट्रॉल कंपनीच्या नावाने बनावट ऑइल विक्री होत असल्याचा प्रकार खेड तालुक्यातील केळगाव येथे उघडकीस आला. याप्रकरणी आळंदी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.गौरव श्रीगिरीश श्रीवास्तव (३८, रा. मध्य प्रदेश) यांनी आळंदी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार अतुल देवराम म्हस्के (३८, रा. केळगाव) याच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांच्या कॅस्ट्रॉल कंपनीचे लेबल बनावट ऑइलच्या बॅरलला चिकटवून ते ऑइल कॅस्ट्रॉल कंपनीचे आहे, असे भासवून त्याची विक्री होत होती. याबाबत फिर्यादी श्रीवास्तव यांनी खातरजमा करून विक्रीसाठी ठेवलेले एक लाख ८४ हजार ८५० रुपये किमतीचे ऑइल पकडले.

या प्रकरणाचा आळंदी पोलिस अधिक तपास करत आहेत. या प्रकरणात आणखी कुणी सहभागी आहेत का त्याचा शोध घेतला जात आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
मंगळवार दिनांक 07/01/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# हप्ता देण्यास नकार दिल्याने कोयत्याने वार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : हप्ता देण्यास नकार दिल्याने सात जणांनी मिळून दुकानदार आणि कामगारांवर कोयत्याने वार केले. ही घटना शुक्रवारी (दि. ३) रात्री पिंपरी येथील प्रगती ॲक्सेसरीज या दुकानात घडली. अनिल मधुकर बैतुले (४९, रा. पिंपळे सौदागर) यांनी पिंपरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

आशिष पाल ऊर्फ कोयत्या आणि त्याचे सहा साथीदार यांच्याविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचे पिंपरी येथे प्रगती ॲक्सेसरीज नावाचे दुकान आहे. शुक्रवारी सायंकाळी संशयित सर्व जण अनिल यांच्या दुकानात आले. त्यांनी अनिल यांच्याकडे हप्ता मागितला.

# व्यावसायिकाची लाखोंची फसवणूक




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : बांधकाम व्यावसायिकाच्या खात्यातून चार लाख ८० हजार रुपये ट्रान्सफर करण्यात आले. ही घटना २५ सप्टेंबर २०२४ रोजी हिंजवडी येथे घडली. बांधकाम व्यावसायिकाने संबंधित व्यक्तीला पैसे परत पाठवण्यास सांगितले. मात्र, त्याने पैसे परत न पाठवता बांधकाम व्यावसायिकाची फसवणूक केली. याप्रकरणी २७ वर्षीय व्यक्तीने हिंजवडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार एम. एस. कवलजोत ट्रेडिंग कंपनीचे मालक गुरपाल लालसिंग सिंग यांच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# पीएमपीच्या चालकांना मिळणार विशेष प्रशिक्षण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) बसचे वाढते अपघात लक्षात घेता प्रशासनाने स्वमालकीच्या आणि ठेकेदारांच्या चालकांना विशेष प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. नाशिक फाटा येथील ड्रायव्हिंग प्रशिक्षण आणि संशोधन संस्थेत (आयडीटीआर) सोमवारपासून (दि. ६) दररोज ५० चालकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे.पीएमपीकडून पुणे, पिंपरी चिंचवडबरोबरच ग्रामीण भागातील पीएमआरडीएच्या हद्दीत दररोज १७०० बसच्या माध्यमातून प्रवाशांना सेवा दिली जाते. यातून सरासरी १० लाखांवर प्रवासी प्रवास करतात. पीएमपीच्या ताफ्यास स्वमालकीच्या आणि ठेकेदारांच्या बसचा समावेशआहे. ठेकेदारांच्या बसवर चालकाची नियुक्ती ठेकेदाराकडून केली जाते. पीएमपीच्या चालकांकडून शहरातील सिग्नल तोडणे, भरधाव वेगाने बस चालवणे, मोबाइल फोनचा वापर करणे, अशा विविध वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. त्यामुळे पीएमपीचे अपघातही मोठ्या प्रमाणात होत आहेत. यामध्ये जीवित आणि आर्थिक हानी मोठ्या प्रमाणात होत आहे. नुकत्याच कुर्ल्यातील बस अपघातामुळे अख्खी मुंबई हादरलेली. एक भरधाव बस कुर्ल्यातील रहदारीच्या रस्त्यावर घुसली आणि तिनं अनेकांना चिरडलं. यात सात जणांचा मृत्यू झाला. तर, तब्बल ४२ हून अधिक जखमी झाले होते. या दुर्घटनेनंतर प्रशासनाने प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे.

# महिलांना ट्रोलिंग करणे हे संकुचित मानसिकतेचे प्रतिक

## महापालिकेच्या परिसंवादात वक्त्यांचा सूर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, दि. ६ जानेवारी २०२५:- प्रतिकूल परिस्थितीमध्ये सावित्रीबाई फुले यांनी निर्भीडपणे विकृत मानसिकतेचा सामना करत आपल्या विचार व भूमिकेवर ठाम राहून सामाजिक क्रांतीचे पाऊल उचलले. सावित्रीबाईंचा हा वारसा प्रत्येक महिलेने अंगीकारायला हवा. महिला अभिव्यक्त होत असताना जाणीवपूर्वक त्यांना ट्रोल करण्याची प्रवृत्ती वाढत असून संकुचित विचारसरणी आणि पुरुषी मानसिकतेचे हे प्रतिक आहे. अशा गोष्टींना महिलांसह समाजातील प्रत्येक घटकांनी ठामपणे प्रतिकार करून आपली भूमिका परखडपणे मांडली पाहिजे, असे विचार महापालिका आयोजित परिसंवादात वक्त्यांनी मांडला. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपरी येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक येथे विचार प्रबोधनपर्वाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी "सावित्रीबाई फुले यांचे विचार आणि आजच्या महिलांची भूमिका" या विषयावरील परिसंवादात सहभागी वक्ते बोलत होते. यामध्ये उद्योजिका डॉ. तृप्ती धनवटे- रामाने, पत्रकार अश्विनी डोके, शर्मिष्ठा भोसले, प्रा. शीलवंत गायकवाड सहभागी झाले होते. डॉ. तृप्ती धनवटे- रामाने म्हणाल्या, सावित्रीबाई फुले यांच्या विचारसरणीचा आधुनिक काळातील महिलांच्या सक्षमीकरणाशी थेट संबंध असून समाजात समानतेचा संदेश पसरवण्यासाठी त्यांचे योगदान देखील महत्वपूर्ण आहे.




पत्रकार शर्मिष्ठा भोसले म्हणाल्या, शिक्षित समाजाने समानतेने वागावे, अशी साधारणपणे अपेक्षा असते. सावित्रीबाई फुले यांच्यासह विविध महामानवांनी समता प्रस्थापित करण्यासाठी आपले आयुष्य वेचले. मात्र लिंगभेद करून आपण समानतेच्या उद्दिष्टाला दूर करत असतो. महिलांची प्रतिमा उभी करताना त्यांना नेहमी विरोधात उभे करण्याचे काम काही माध्यमे करीत असतात. तर आजही आपण पारलिंगी समुहाचे अस्तित्वदेखील मान्य करीत नाही, ही शोकांतिका आहे.

पत्रकार अश्विनी सातव – डोके म्हणाल्या, उत्तम सहजीवन कसे असावे याचे अप्रतिम उदाहरण म्हणजे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आणि क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले आहे. त्यांच्या काळात त्यांनी अनिष्ठ रूढी व परंपरा झुगारून प्रगतीशील विचार आणि कृतींचा अवलंब केला. त्याबद्दल आपण नेहमी कृतज्ञ असायला हवे.

प्रा. शीलवंत गायकवाड म्हणाले, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आणि क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांनी शिक्षण तसेच समाजात समानतेचा संदेश पसरवण्यासाठी त्यांचे संपूर्ण आयुष वाहून घेतले त्यामुळे आपण आज सुवर्णक्षण जगतो आहोत. सावित्रीबाई फुले आणि जोतीराव फुले यांच्या विचारांना अंगीकारणे आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचे आहे. या कार्यक्रमास विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते बापूसाहेब गायकवाड, विशाल जाधव, शंकर लोंढे, संतोष जोगदंड, ॲड विद्या शिंदे, साधना मेश्राम, अनिरुद्ध सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पौर्णिमा भोर यांनी केले.


दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 07/01/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# आमिर खानच्या मुलाने 'लापता लेडीज'साठी दिली होती ऑडिशन



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

आमिर खानचा मुलगा अभिनेता जुनैद खानने २०२४ मध्ये 'महाराज' या चित्रपटातून सिनेसृष्टीत पदार्पण केले. या चित्रपटातील त्याची आणि अभिनेत्री शर्वरी वाघची केमिस्ट्री प्रेक्षकांच्या पसंतीस पडली होती. यशराज फिल्म्सच्या 'महाराज' या चित्रपटात झळकण्याआधी, जुनैद खानने त्याच्या वडिलांच्या आणि सावत्र आई किरण रावच्या चित्रपटांसाठी ऑडिशन दिले होते. जुनैदने त्याच्या वडिलांचा 'लाल सिंग चड्ढा' आणि सावत्र आई किरण रावचा 'लापता लेडीज' या दोन चित्रपटांसाठी ऑडिशन दिले होते.

एका मुलाखतीत जुनैदने या अनुभवांबद्दल माहिती दिली. बजेटची मर्यादा आणि योग्य कास्टिंगसाठीचा शोध या गोष्टींनी या निर्णयांवर कसा परिणाम केला हे त्याने उलगडून सांगितले.

जुनैदने सांगितले की, त्याने आणि किरण रावने 'लाल सिंग चड्ढा'साठी आई-मुलाच्या भूमिकेसाठी एकत्रित ऑडिशन दिले होते. तो म्हणाला, "मी तुम्हाला 'लाल सिंग चड्ढा' मध्ये दिसलो असतो, कारण मी आणि किरण रावने त्यासाठी चाचणी दिली होती. यात किरण माझी आई बनली होती. आम्ही चित्रपटासाठी सात-आठ दृश्ये चित्रीत केली, जवळपास २० मिनिटांचे फुटेज तयार झाले. ही माझ्यासाठीदेखील एक चाचणी होती. पप्पा मला मी चित्रपटाच्या प्रक्रियेशी कसे जुळवून घेतो हे पाहू इच्छित होते. पण, शेवटी मुख्यतः बजेटच्या कारणामुळे ते शक्य झाले नाही. नवीन व्यक्तीसाठी अशा महागड्या चित्रपटात काम करणे कठीण होते."

जरी त्याला भूमिका मिळाली नाही तरी या अनुभवामुळे जुनैदला त्याच्या वडिलांबरोबर जवळून काम करण्याची संधी मिळाली. आमिर खानने या चित्रपटाची सहनिर्मिती केली होती. १९९४ च्या 'फॉरेस्ट गंप' या अमेरिकन सिनेमाचा हा भारतीय रिमेक होता.

'लाल सिंग चड्ढा' व्यतिरिक्त जुनैदने किरण रावच्या 'लापता लेडीज' या चित्रपटाच्या मुख्य भूमिकेसाठीदेखील ऑडिशन दिले होते. त्या अनुभवाबद्दल तो म्हणाला, "'लापता लेडीज'चा अनुभव खूप वेगळा होता. मी त्यासाठी स्क्रीन टेस्ट दिली होती. पण, किरणने मला सांगितले की 'या भूमिकेसाठी स्पर्श श्रीवास्तव जास्त योग्य आहे' आणि मी तिच्याशी सहमत आहे. तो त्या भूमिकेसाठी अधिक चपखल होता."

# 11 वर्षांनी पुन्हा प्रदर्शित झाला 'ये जवानी है दिवानी' चित्रपट!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



रणबीर कपूर आणि दीपिका पादुकोण यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'ये जवानी है दीवानी' चित्रपट ३१ मे २०१३ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आला. या सिनेमातली गाणी असो किंवा संवाद सगळ्या गोष्टी आजही सिनेप्रेमींच्या अगदी तोंडपाठ आहेत.

बाहेरगावी विविध देशांमध्ये फिरणं, पॅशन, करिअर या सगळ्यात बांधला गेलेला बनी आणि त्याची गाडी पुन्हा एकदा रुळावर आणणारी स्कॉलर नैना या दोघांची जुगलबंदी आपल्याला या चित्रपटात पाहायला मिळते.

रणबीर-दीपिकाची पहिली भेट चित्रपटात मनालीला ट्रेकला जाताना होते. मुळात शांत आणि संयमी अशी नैना पहिल्यांदाच मित्रांबरोबर इतक्या दूरवर फिरायला जाते. यानंतर ती बनीच्या प्रेमात पडते. पण, त्याच्या आयुष्यातलं बाहेरगावी जाण्याचं ध्येय लक्षात घेऊन ती आपलं प्रेम व्यक्त करत नाही. यानंतर या दोघांची भेट पुन्हा एकदा काही वर्षांनी अदितीच्या लग्नात होते. या अदितीची भूमिका कल्कीने साकारलीये. तर, आदित्य रॉय कपूर चित्रपटात अवी या बनीच्या जवळच्या मित्राच्या भूमिकेत आहे. 'ये जवानी है दीवानी' हा चित्रपट अनेकांसाठी आदर्श ठरला होता. यावरुन या सिनेमाची क्रेझ किती मोठ्या प्रमाणात आहे हे लक्षात येतं. या सिनेमाचं दिग्दर्शन अयान मुखर्जीने केलेलं आहे. तर, करण जोहरने या चित्रपटाची निर्मिती केली आहे. धर्मा प्रोडक्शनने या नव्या वर्षात जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी 'ये जवानी है दीवानी' चित्रपट थिएटरमध्ये पुन्हा एकदा प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला.

'ये जवानी है दीवानी' २०१३ मध्ये ब्लॉकबस्टर ठरला होता. त्यामुळे पुन्हा प्रदर्शित झाल्यावर हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर काय जादू करणार याकडे सर्वांचं लक्ष होतं. अखेर करण जोहरने स्वत: पोस्ट शेअर करत रि-रिलीज झाल्यावर चित्रपटाचं किती कलेक्शन झालं याची आकडेवारी जाहीर केली आहे. 'ये जवानी है दीवानी' सिनेमाने रि-रिलीजनंतर पहिल्या दिवशी १.१५ कोटी, दुसऱ्या दिवशी २.२५ कोटी आणि तिसऱ्या दिवशी २.८५ कोटींची कमाई केली. यामुळे पुन्हा प्रदर्शित होऊन सुद्धा या सिनेमाने फक्त तीन दिवसांत तब्बल ६.२५ कोटी कमावले आहेत.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968